पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय
**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१५)**

दिनांक : ०५/०२/२०२१ वेळ: सकाळी १०.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०२१ ची दिनांक ०५/०२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

१) मा.बुर्डे सुवर्णा विकास - सदस्या (सभा अध्यक्ष)
२) मा.गायकवाड निर्मला मनोज - सदस्या
३) मा.बारसे प्रियांका देविदास - सदस्या

या शिवाय मा.अवधूत तावडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.बाळू लांडे- उपअभियंता विद्युत, श्रीम.प्रेरणा शिनकर, श्री.देवेंद्र बोरावके - उपअभियंता स्थापत्य, श्री.दिनेश फाटक, श्री.सुदर्शन वहीकर-उपअभियंता पा.पु., श्री.विजय वाईकर-यंता जलनि:सारण श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, श्री.गुमास्ते ए.व्ही.-मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.बी.के. कार्लेतिक्रमण निरीक्षक, श्री.डी.एम. भिसे-क्रिडा पर्यवेक्षक, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक: मा. प्रियांका बारसे अनुमोदक: मा.निर्मला गायकवाड

सभा कामकाज भरविणेकामी नेमलेल्या वेळी मा.सभापती सभागृहात हजर नसलेने आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून मा.सुवर्णा बुर्डे यांनी कामकाज पहावे.
सदर सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आली (मा.सुवर्णा बुर्डे यांनी सभा अध्यक्ष स्थान स्विकारले)

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.
सुचक: मा. प्रियांका बारसे अनुमोदक: मा.निर्मला गायकवाड

ऐन वेळेचे विषय दाखल करण्यात येवून आज होणारी प्रभाग समितीची मासिक सभा कोरम अभवी तहकूब करणेत यावी.
(सदर सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आली)

मा.सभा अध्यक्षांच्या परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय दाखल करून घेण्यात आले.

विषय क्र.१ मा.प्रियांका प्रविण बारसे यांचा विषय
प्रभाग क्र.५ मध्ये गवळीनगर सार्वजनिक स्वच्छता गृहामध्ये दरूस्ती करून स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी तेथे कायम स्वरूपी कार्यालय करणेबाबत.

विषय क्र.२ मा.विकास हरिश्चंद्र डोळस यांचा विषय
स्वच्छता अभियान अंतर्गत माहे मार्च २०२१ मध्ये अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

मा.सभा अध्यक्ष: आज होणारी प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १६/०२/२०२१ रोजी १०.४५ वा. पर्यात तहकूब करण्यात येत आहे.

सही/-
(सुवर्णा बुर्डे)
सभा अध्यक्षा
इ प्रभाग समिती

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ स्विस/ १३ /२०२१
दिनांक : १२ /०२ /२०२१

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## इ क्षेत्रीय कार्यालय
## **सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१५)**

दिनांक : १६/०२/२०२१ वेळ: सकाळी १०.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०२१ ची दिनांक ०५/०२/२०२१ रोजी तहकूब करणेत आलेली मसिक सभा दिनांक १६/०२/२०२१ रोजी सकाळी १०.४५ वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

१) मा.डोळस विकास हरिश्चंद्र - सभापती
२) मा.गायकवाड निर्मला मनोज - सदस्या
३) मा.सागर बाळासाहेब गवळी - सदस्य
४) मा.बारसे प्रियांका देविदास - सदस्या
५) मा.फुगे भिमाबाई पोपट - सदस्या
६) मा.बुर्डे अजित प्रताप - स्वीकृत सदस्य
७) मा.साधना सचिन तापकीर - स्वीकृत सदस्या
८) मा.लांडे विजय नामदेव - स्वीकृत सदस्य

या शिवाय मा.अवधूत तावडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री.प्रविण घोडे- कार्यकारी अभियंता विद्युत श्री.बाळू लांडे- उपअभियंता विद्युत, श्रीम.प्रेरणा शिनकर, श्री.देवेंद्र बोरावके - उपअभियंता स्थापत्य, श्री.दिनेश फाटक, श्री.सुदर्शन वहीकर- उपअभियंता पा.पु., श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, श्री.गुमास्ते ए.व्ही.-मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.शशिकांत गायकवाड-उपलेखापाल इत्यादी अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सूरू करणेस अनुमती दिली.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५७ | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : | १६/०२/२०२१ | विभाग | : | स्थापत्य /आरोग्य |
| सुचक | : | मा. प्रियांक प्रविण बारसे | अनुमोदक | : | मा. निर्मला मनोज गायकवाड |

संदर्भ मा. प्रियांक प्रविण बारसे यांचा प्रस्ताव
मा.सभापती यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.५ गवळीनगर मध्ये १०२ स्वच्छता कर्मचारी काम करीत असून त्यात मनपा आरोग्य कर्मचारी, घंटागाडी ठेकेदार, एम.पी.एम.एच. कर्मचारी व संस्था कर्मचारी काम करतात. या कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड, महिलांसाठी चेंजींग रूम, आरोग्य कर्मचाऱ्यांचे साहित्य तसेच जेवण करण्यासाठी जागा कायमस्वरूपी प्रभागात असणे गरजेचे आहे. त्यासाठी गवळीनगर मधील स्वच्छतागृह ज्याचा वापर होत

नाही त्याच्या भिंतीला धक्का न लावता आतील कप्पे पाडून त्याची दूरूस्ती करून स्व्च्छता कर्मचाऱ्यांसाठी कायम स्वरूपी कार्यालय तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ५८ | विषय क्रमांक | : | ०२ |
| दिनांक | : | १६/०२/२०२१ | विभाग | : | लेखा |
| सुचक | : | मा. भिमाबाई फुगे | अनुमोदक | : | मा. प्रियांक प्रविण बारसे |

संदर्भ मा. विकास हरिश्चंद्र डोळस यांचा प्रस्ताव
मा.सभापती यांनी शिफारस केले प्रमाणे

स्वच्छता अभियान अंतर्गत नगर सदस्यांचा अभ्यास दौरा माहे मार्च २०२१ मध्ये आयोजित करावयाचा आहे. सदरचे अभ्यास दौऱ्यामध्ये शहर स्वच्छता, कचरा विल्हेवाट, शाळेतील स्वच्छता प्रकल्प, पर्यटन स्थळावरील स्वच्छता नियोजन इ.बाबत जम्मु आणि काश्मीर राज्यातील महत्वाच्या शहरांना भेटी द्यावयाच्या आहेत. सदर दौऱ्यासाठी इ प्रभाग समितीचे सदस्य व इ प्रभागातील ४ अधिकारी/कर्मचारी यांचे साठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सही/-
(विकास डोळस)
सभापती
इ प्रभाग समिती

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ स्विस/ १७ /२०२१
दिनांक : २५ /०२ /२०२१

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२-/सभावृत्तांतातील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.